**मराठी विभाग आयोजित**

**शारदोत्सव २०२३ (वर्ष तिसरे) व्याख्यानमाला**

**१५ ऑक्टोबर ते २३ ऑक्टोबर २०२३**

# नवदुर्गा : नवविचार




नवदुर्गा : नवविचार व्याख्यानमाला भित्तिपत्रिका

## पुष्प पहिले

## स्त्री वाचते तेव्हा

### व्याख्याते : भारत गौरव पुरस्कार प्राप्त सौ. राजश्री बोहरा.

''दिसामाजी काही तरी वाचत रहावे. वाचन ही एकमेव गोष्ट आहे जी तुमचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात असते. वाचनाने ज्ञान वृद्धिंगत होते, आपल्याकडे ज्ञानाचा खजिना असेल तर आपण आयुष्यातील प्रत्येक समस्येवर यशस्वीपणे मात करू शकतो असे प्रतिपादन शिक्षिका, साहित्यिका, कवयित्री व भारत गौरव पुरस्कार प्राप्त सौ.राजश्री बोहरा यांनी सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती. माणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालयातील मराठी विभाग, जी.ओ. शाह ग्रंथालय आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'शारदोत्सव २०२३' व्याख्यानमाला अंतर्गत 'नवदुर्गा : नवविचार' व 'वाचन प्रेरणा दिन' याचे औचित्य साधून आयोजित केलेल्या 'स्त्री वाचते तेव्हा' ह्या पहिल्या व्याख्याना प्रसंगी केले.''

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. अर्चना यांनी कार्यक्रमात उपस्थितांचे स्वागत करीत स्त्रीशक्तीला वंदन करून, वाचन प्रेरणा दिनाच्या शुभेच्छा दिल्या. एक चांगले पुस्तक शंभर मित्रांप्रमाणे असतो त्यामुळे प्रत्येक विद्यार्थिनींं आपल्या जीवनात अनेक साहित्य, पुस्तके ह्यांचे वाचन करीत रहावे हे भारतरत्न माजी राष्ट्रपती मिसाईलमॅन डॉ. ए पी जे अब्दुल कलाम ह्यांचे विचार विद्यार्थिनीं पुढे मांडले. आजची पहिली माळ ही मातृदेवतेची आहे त्यामुळे आपल्या मातृभाषेबद्दल आदर बाळगला पाहिजे आणि मराठीतील दर्जेदार साहित्य वाचत राहिले पाहिजे, असा मोलाचा संदेश विद्यार्थिनींना दिला.



E-NEWS लक्ष्यभेद

आपल्याकडे ज्ञानाचा खजिना असेल तर आपण आयुष्यातील प्रत्येक समस्येवर यशस्वीपणे मात करू शकतो - भारत गौरव पुरस्कार प्राप्त सौ. राजश्री बोहरा यांचे प्रतिपादन






अचूकवार्ता

आपल्याकडे ज्ञानाचा खजिना असेल तर आपण आयुष्यातील प्रत्येक समस्येवर यशस्वीपणे मात करू शकतो. - भारत गौरव पुरस्कार प्राप्त सौ. राजश्री बोहरा.

**पुष्प दुसरे**

**<u>महाराष्ट्राचा उंबरठा ओलांडताना</u>**

**व्याख्याते : कवयित्री वृषाली पाटील**

सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती. माणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित ‘शारदोत्सव २०२३’ व्याख्यानमाला अंतर्गत ‘नवदुर्गा : नवविचार’ याचे औचित्य साधून आयोजित व्याख्यानमालेच्या दुसऱ्या दिवशी साहित्यिका,कवयित्री वृषाली पाटील यांनी ‘महाराष्ट्राचा उंबरा ओलांडताना’ या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या व्याख्याना प्रसंगी त्यांनी त्यांचे अनुभव व आठवणींना उजाळा देत त्यांच्या काव्य लेखनाचा प्रवास कसा सुरू झाला याबद्दल सांगितले. विवाहानंतर महाराष्ट्रातून कर्नाटकात आल्यावर त्यांना सर्वात मोठी अडचण भाषेची आली. तिथली कन्नड भाषा हा एक मोठा अडसर होता, रोजच्या व्यवहारात वावरताना भाषेमुळे त्यांना अडचण येत होती म्हणून त्या कन्नड भाषा शिकल्या. या व्याख्यानाच्या निमित्ताने त्यांनी अनेक स्वरचित कविता सादर केल्या. ‘उंबरा ओलांडताना’, ‘ऐक कृष्णामाई’, ‘मोकळा श्वास’ अशा अनेक कवितांचे त्यांनी वाचन केले. आपल्या मनातलं हितगुज त्यांनी विद्यार्थिनींसोबत कवितेच्या पाऊल वाटेने केले.



५ बुधवार, दि. १८ ऑक्टोबर २०२३

**शब्दांना ओंजळीत फुलवणारी कवयित्री - वृषाली पाटील**

**वसई, प्रतिनिधी**

सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती. माणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित ङ्गशारदोत्सव २०२३’ व्याख्यानमाला अंतर्गत ङ्गनवदुर्गा : नवविचारफ याचे औचित्य साधून आयोजित व्याख्यानमालेत साहित्यिका,कवयित्री वृषाली पाटील यांनी ङ्गमहाराष्ट्राचा उंबरा ओलांडतानाफ या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या व्याख्याना प्रसंगी त्यांनी त्यांचे अनुभव व आठवर्णीना उजाळा देत त्यांच्या काव्य लेखनाचा प्रवास कसा सुरू झाला याबद्दल सांगितले. विवाहानंतर महाराष्ट्रातून कर्नाटकात आल्यावर त्यांना सर्वात मोठी अडचण भाषेची आली. तिथली कन्नड भाषा हा एक मोठा अडसर होता, रोजच्या व्यवहारात वावरताना भाषेमुळे त्यांना अडचण येत होती म्हणून त्या कन्नड भाषा शिकल्या. या व्याख्यानाच्या निमित्ताने त्यांनी अनेक स्वरचित कविता सादर केल्या. ङ्गउंबरा ओलांडतानाफ ङ्गऐक कृष्णामाईफ ङ्गमोकळा श्वासफ अशा अनेक कवितांचे त्यांनी वाचन केले. आपल्या मनातलं हितगुज त्यांनी विद्यार्थिनींसोबत कवितेच्या पाऊल वाटेने केले.सदर कार्यक्रम आभासी पद्धतीने पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. रश्मी शेटये- तुपे यांनी केले. प्रमुख मार्गदर्शकांची ओळख प्रा. सुप्रिया शिंदे-टाकळे यांनी केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील मान्यवर प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.



रुणालय व्हावे म्हणून लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, अजूनही कोणताही निर्णय न झाल्याने प्राथमिक केंद्राची दुरवस्था आहे.

**शब्दांना ओंजळीत फुलवणारी कवयित्री - वृषाली पाटील**

**वसई दि. १६ (प्रतिनिधी) :** सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती. माणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित शारदोत्सव २०२३ व्याख्यानमाला अंतर्गत नवदुर्गा : नवविचार याचे औचित्य साधून आयोजित व्याख्यानमालेत साहित्यिका कवयित्री वृषाली पाटील यांनी महाराष्ट्राचा उंबरा ओलांडताना' या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या व्याख्याना प्रसंगी त्यांनी त्यांचे अनुभव व आठवणींना उजाळा देत त्यांच्या काव्य लेखनाचा प्रवास कसा सुरू झाला याबद्दल सांगितले. विवाहानंतर महाराष्ट्रातून कर्नाटकात आल्यावर त्यांना सर्वात मोठी अडचण भाषेची आली. तिथली कन्नड भाषा हा एक मोठा अडसर होता, रोजच्या व्यवहारात वावरताना भाषेमुळे त्यांना अडचण येत होती म्हणून त्या कन्नड भाषा शिकल्या. या व्याख्यानाच्या निमित्ताने त्यांनी अनेक स्वरचित कविता सादर केल्या.

उंबरा ओलांडताना, ऐक कृष्णामाई, मोकळा श्वास अशा अनेक कवितांचे त्यांनी वाचन केले. आपल्या मनातलं हितगुज त्यांनी विद्यार्थिनींसोबत कवितेच्या पाऊल वाटेने केले.

सदर कार्यक्रम आभासी पद्धतीने पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. रश्मी शेटये- तुपे यांनी केले. प्रमुख मार्गदर्शकांची ओळख प्रा. सुप्रिया शिंदे-टाकळे यांनी केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील मान्यवर प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या

**पुष्प तिसरे**

**मायेचा कानमंत्र**

**व्याख्याते : लेखिका, कवियित्री सौ.विद्याराणी मलवडकर**

‘‘मायेचा स्पर्श आणि प्रेमळ बोल यांची गरज सगळ्यांनाच असते हे जगणे सकारात्मकतेने जगणे निराश न होणे हे आयुष्याच्या टप्प्यावर फार महत्त्वाचे आहे. असे विधान कवयित्री, लेखिका, ‘साहित्य कस्तुरी’ संचालिका सौ.विद्याराणी मलवडकर यांनी व्यक्त केले.’’

सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग जी.ओ.शाह ग्रंथालय आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘शारदोत्सव २०२३’ व्याख्यानमाला अंतर्गत ‘नवदुर्गा : नवविचार’ याचे औचित्य साधून आयोजित व्याख्यानमालेच्या तिसऱ्या दिवशी लेखिका, कवियित्री सौ.विद्याराणी मलवडकर यांनी ‘मायेचा कानमंत्र’ या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या व्याख्याना प्रसंगी त्यांनी त्यांचे अनुभव व आठवणींना उजाळा देत अवास्तव अपेक्षा न बाळगल्यास स्वतःचा प्रवास अविरत सुरू ठेवणे गरजेचे आहे असा ही कानमंत्र विद्यार्थिनींना दिला.चांगली व्यक्ती म्हणून जगण्यासाठी माणुसकी जपण्याची शिकवण त्यांनी या वेळेला दिली. यावेळी आई-वडिलांचा आदर करावा, चांगली संगत ठेवा आणि महत्त्वाचे म्हणजे आत्मनिर्भर व्हा, असे अनेक कानमंत्र त्यांनी यावेळी दिले.






## पुष्प चौथे
## उद्योगजग आणि स्त्री
## व्याख्याते : व्यवसायिक सौ. प्रियंका कुटे

सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती. माणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित 'शारदोत्सव २०२३' व्याख्यानमाला अंतर्गत 'नवदुर्गा : नवविचार' याचे औचित्य साधून आयोजित व्याख्यानमालेच्या चौथ्या दिवशी व्यवसायिक, कवयित्री सौ. प्रियंका कुटे यांनी 'उद्योगजग आणि स्त्री' या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या व्याख्याना प्रसंगी 'व्यवसायाशी निगडीत अनुभव व आठवणींना उजाळा देत त्यांच्या काव्य लेखनाचा प्रवासही मांडला. पर्यटन क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रियंका कुटे ह्या विवाहानंतर स्वतःच्या व्यवसायाकडे वळल्या. स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी सर्वांत प्रथम स्वतःमध्ये आत्मविश्वास निर्माण करा. कडूगोड अनुभवातूनही स्वतःचे खच्चीकरण न करता खंबीरपणे उभे रहा, असा मोलाचा संदेश विद्यार्थिनींना दिला.'विद्यार्थिनींच्या प्रश्नोत्तरांना उत्तरे देत कार्यक्रमाची सांगता झाली.


E-NEWS लक्ष्यभेद

संपर्क :- संदीप तवले
78430 64018

स्वत:चा व्यवसाय उभारण्यासाठी सर्वांत प्रथम स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण करा - प्रियंका कुटे

स्वत:चा व्यवसाय उभारण्यासाठी सर्वांत प्रथम स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण करा - प्रियंका कुटे



सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती. माणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित 'शारदोत्सव २०२३' व्याख्यानमाला अंतर्गत 'नवदुर्गा : नवविचार' याचे औचित्य साधून आयोजित व्याख्यानमालेत व्यवसायिक, कवयित्री सौ. प्रियंका कुटे यांनी 'उद्योगजग आणि स्त्री' या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या व्याख्याना प्रसंगी 'व्यवसायाशी निगडीत अनुभव व आठवणींना उजाळा देत त्यांच्या काव्य लेखनाचा प्रवासही मांडला. पर्यटन क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रियंका कुटे ह्या विवाहानंतर स्वत:च्या व्यवसायाकडे वळल्या. स्वत:चा व्यवसाय उभारण्यासाठी सर्वांत प्रथम स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण करा. कडूगोड अनुभवातूनही स्वत:चे खच्चीकरण न करता खंबीरपणे उभे रहा, असा मोलाचा संदेश विद्यार्थिनींना दिला.'विद्यार्थिनींच्या प्रश्नोत्तरांना उत्तरे देत कार्यक्रमाची सांगता झाली.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. रश्मी शेटये- तुपे यांनी केले. प्रमुख मार्गदर्शकांची महाविद्यालयाच्या वतीने स्वागत वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. दक्षा दव यांनी केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील मान्यवर प्राध्यापक आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.


स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी सर्वांत प्रथम स्वतःमध्ये आत्मविश्वास निर्माण करा –प्रियंका कुटे

वसई दि. १९ (प्रतिनिधी) । सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती. माणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित शारदोत्सव २०२३ व्याख्यानमाला अंतर्गत नवदुर्गा : नवविचार याचे औचित्य साधून आयोजित व्याख्यानमालेत व्यवसायिक, कवयित्री सौ. प्रियंका कुटे यांनी उद्योगजग आणि स्त्री या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या व्याख्याना प्रसंगी व्यवसायाशी निगडीत अनुभव व आठवणींना उजाळा देत त्यांच्या काव्य लेखनाचा प्रवासही मांडला. पर्यटन क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रियंका कुटे ह्या विवाहानंतर स्वत:च्या व्यवसायाकडे वळल्या. स्वत:चा व्यवसाय उभारण्यासाठी सर्वांत प्रथम स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण करा. कडूगोड अनुभवातूनही स्वत:चे खच्चीकरण न करता खंबीरपणे उभे रहा, असा मोलाचा संदेश विद्यार्थिनींना दिला. विद्यार्थिनींच्या प्रश्नोत्तरांना उत्तरे देत कार्यक्रमाची सांगता झाली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. रश्मी शेटये- तुपे यांनी केले. प्रमुख मार्गदर्शकांची महाविद्यालयाच्या वतीने स्वागत वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. दक्षा दव यांनी केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील मान्यवर प्राध्यापक आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

**पुष्प पाचवे**

**प्रसार माध्यमातील ती**

**व्याख्याते : झी२४तास.com च्या चीफ सबएडिटर दक्षता ठासळे - घोसाळकर**

सध्याचे युग हे प्रसारमाध्यमांचे युग आहे. वर्तमानपत्रे, दूरदर्शन, आकाशवाणी,अंतरजाल (इंटरनेट) ही आजच्या काळातील महत्त्वाची प्रसार माध्यमे असून लोकशाही अधिक समृद्ध होण्यासाठी तसेच माहितीचा मुक्त प्रवाह समाजात पसरविण्यासाठी प्रसारमाध्यमांची आवश्यकता असते.स्त्रिया हे माध्यम शिक्षण गांभीर्याने घेत नाहीत; स्त्रियांचे हे क्षेत्र नव्हे या जुनाट भूमिकेतून बाहेर पडलं पाहिजे. ज्ञान आणि कौशल्य यांच्या बळावर प्रसार माध्यमातील स्त्रियांचा सहभाग निश्चित वाढू शकतो. असे विधान झी२४तास.com च्या चीफ सबएडिटर दक्षता ठासळे-घोसाळकर यांनी केले. सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित 'शारदोत्सव व्याख्यानमाला २०२३' अंतर्गत 'नवदुर्गा: नवविचार' याचे औचित्य साधून आयोजित व्याख्यानमालेच्या पाचव्या दिवशी दक्षता ठसळे- घोसाळकर यांनी 'प्रसारमाध्यमातील ती' या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.



असे मत शिवसेना महिला शहरप्रमुख सुचिता नाईक यांनी व्यक्त केले

**ज्ञान आणि कौशल्य यांच्या बळावर प्रसार माध्यमातील स्त्रियांचा सहभाग निश्चित वाढू शकतो.- दक्षता ठसळे- घोसाळकर**

**वसई दि. २० (प्रतिनिधी) :** सध्याचे युग हे प्रसारमाध्यमांचे युग आहे. वर्तमानपत्रे,दूरदर्शन,आकाशवाणी, अंतरजाल (इंटरनेट) ही आजच्या काळातील महत्त्वाची प्रसार माध्यमे असून लोकशाही अधिक समृद्ध होण्यासाठी तसेच माहितीचा मुक्त प्रवाह समाजात पसरविण्यासाठी प्रसारमाध्यमांची आवश्यकता असते.स्त्रिया हे माध्यम शिक्षण गांभीर्याने घेत नाहीत; स्त्रियांचे हे क्षेत्र नव्हे या जुनाट भूमिकेतून बाहेर पडलं पाहिजे. ज्ञान आणि कौशल्य यांच्या बळावर प्रसार माध्यमातील स्त्रियांचा सहभाग निश्चित वाढू शकतो.असे विधान झी २४ तास डॉट कॉमच्या चीफ सबएडिटर दक्षता ठसळे- घोसाळकर यांनी केले. सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित शारदोत्सव व्याख्यानमाला २०२३ अंतर्गत नवदुर्गा: नवविचार याचे औचित्य साधून आयोजित व्याख्यानमालेच्या पाचव्या दिवशी दक्षता ठसळे- घोसाळकर यांनी प्रसारमाध्यमातील ती या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. प्रसार माध्यमे या क्षेत्रात ग्राफिक्स, फोटोग्राफर, एडिटर, कॉस्ट्यूम कन्सल्टंट, कन्टेन्ट राईटर, डिजिटल हेड अशा अनेक संधी आपल्यासमोर आहेत.असे मत त्यांनी यावेळी मांडले. या कार्यक्रमासाठी समाजशास्त्र विभागाच्या प्रा.किरण जाधव, समाजशास्त्र विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ.रेखा शेलार उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ.रश्मी शेट्ये तुपे यांनी केले.तर प्रमुख मार्गदर्शकांची ओळख प्रा.सुप्रिया शिंदे यांनी केले. या कार्यक्रमासाठी अनेक विद्यार्थिनी उपस्थित होत्या

**पुष्प सहावे**

**स्वराधार**

**व्याख्याते : संस्थापक,अध्यक्ष - श्रीमती हेमलता तिवारी**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक ते स्वराधार संस्थेच्या संस्थापक, अध्यक्ष श्रीमती हेमलता तिवारी यांचा प्रवास प्रेरणादायक आहे. आपण मुंबईच्या धावपळीच्या जगात रेल्वे स्टेशनवर अनेक व्यक्तींना गाणे म्हणून आपली उपजीविका भागवताना पाहत असतो. त्यांच्याविषयी आपल्या मनात करुणा वाटते परंतु भिकारी या पलीकडे त्यांच्याकडे कोणत्याही दृष्टिकोनातून पाहिले जात नाही. यातील बहुतांश व्यक्ती नेत्रहीन असतात. ही संस्था त्यांच्यासाठीच काम करते. रेल्वे स्टेशनवर गाणं गाणाऱ्या अपंग व्यक्तींना प्रशिक्षण देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी जून २०१२ मध्ये 'स्वराधार' या संस्थेची निर्मिती हेमलता तिवारी यांनी केली. त्यांच्यासाठी काम करताना येणाऱ्या अडचणी व त्यातून काढलेले मार्ग हे सगळे अनुभव विद्यार्थिनी समोर मनमोकळेपणाने मांडला. निमित्त होते सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित 'शारदोत्सव २०२३' व्याख्यानमाला अंतर्गत 'नवदुर्गा: नवविचार' याचे औचित्य साधून आयोजित व्याख्यानमालेच्या सहाव्या दिवशी हेमलता तिवारी यांनी 'स्वराधार' या विषयावर विद्यार्थिनींसोबात संवाद साधला.



सामाजिक , शैक्षणिक क्रांती करणारे , आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले एकमेव डिजिटल अनियतकालीक

**वर्ल्ड व्हिजन टाईम्स मुंबई**

दिनांक : २९ ऑक्टोबर २०२३
वार : रविवार
अंक : ९८

संपादक : प्रा. नागेश सोपान हुलवळे । संपर्क : 8850518037

**कालच्या लग्नाची एक गोष्ट**

काल लग्नाला गेलो होतो. तेव्हा बघितलं तर एक नवीन गोष्ट लक्षात आली.मी त्या मंगलकार्यालयात बघितलं तर तिथे पाहुण्यांना बसायला खुर्च्या टाकलेल्या होत्या.खुर्च्या तर होत्या पण खुर्ची सारख्या नव्हत्या म्हणजे खुर्च्याच होत्या पण नवीन सुंदरता (Fashion, style, Modern जमाना) दिलेली होती.तस बाकी काही नवीन नव्हत फक्त खुर्चीनां एका अतिशय सुंदर अश्या कापडा।ने तिला पूर्ण झाकलेले होत म्हणजेच काय तर खुर्चीला कपडे घातलेले होते.साधी खुर्ची आणि पूर्ण कपडे घातलेली खुर्ची या दोघांमध्ये तर खूपच फरक दिसत होता.ज्या खुर्चीला कपडे (कापड) घातलेले होते ती अतिशय सुंदर दिसत होती आणि साधी खुर्ची साधी दिसत होती.या गोष्टीवरून एवढेच सांगायचं आहे की जर पूर्ण कपडे घातल्यावर खुर्ची सुंदर दिसू शकते तर आपल्या भारतातील मुली- मुलं का सुंदर दिसू शकत नाही.तुम्हाला अधिकार आहे कोणते कपडे घालायचे कोणते नाही हे मला मान्य आहे. आपण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यात राहतो,आपला भारत देश म्हणजे एक देवभूमी च आहे.आपण भारत माता का म्हणतो कारण भारत हा देश नसून भारत माता,आई,माय, देवी, इ. आहे.

तुम्ही shorts कपडे घाला पण कुठे आपल्या घरी. लोकांना का अंगप्रदर्शन करून दाखवता.ताईंनो आपली संस्कृती काय आहे,आपण कुठे राहतो याचं भान ठेवा. फक्त शिवजयंती च्या दिवशी साडी,नथ,फेटा आणि बुलेट चालवल्याने तुम्ही शिवकन्या नाही होत मी या मताचा आहे.जर मी माझ्या गावात shorts Night पॅन्ट घालून गेलो तरी लोक नाव ठेवता,वेड्यात काढतात. मुलांनाच जर तुम्ही short पॅन्ट घातल्यामुळे नाव ठेवता आणि इकडे आपली मुलगी शहरात shorts कपडे घालून अंगप्रदर्शन करते किंवा पूर्ण शहर फिरते(हिंडते).

माझा Shorts कपड्याना विरोध नाही आहे फक्त गर्दीच्या ठिकाणी,लग्नकार्यात,इ.अश्या ठिकाणी घालू नका बस एवढेच म्हणणं आहे.

बाकी तुमची मर्जी,तुमचं स्वतंत्र, तुमची इच्छा,तुमचे अधिकार आणि हो सर्वच मुलं-मुली सारखी नसतात कारण पाची बोटे सारखी नाहीत आणि सारखे असायला पण नाही पाहिजे.काही चुकलं असेल तर माफ करा बंधु आणि भगिनींनो. वसुदेव कुटुंबकम

**भुषण (किरण) भास्कर जाधव**
**रा.खारीपाडा ता. देवळा जि. नाशिक.**

**दृष्टी नाही दृष्टिकोन बदला हा मूलमंत्र उरी बाळगून स्वरांना आधार देण्याचा प्रवास सुरू झाला – श्रीमती हेमलता तिवारी**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक ते स्वराधार संस्थेच्या संस्थापक,अध्यक्ष श्रीमती हेमलता तिवारी यांचा प्रवास प्रेरणादायक आहे आपण मुंबईच्या धावपळीच्या जगात रेल्वे स्टेशनवर अनेक व्यक्तींना गाणे म्हणून आपली उपजीविका भागवताना पाहत असतो. त्यांच्याविषयी आपल्या मनात करुणा वाटते परंतु भिकारी या पलीकडे त्यांच्याकडे कोणत्याही दृष्टिकोनातून पाहिले जात नाही. यातील बहुतांश व्यक्ती नेत्रहीन असतात.ही संस्था त्यांच्यासाठीच काम करते. रेल्वे स्टेशनवर गाणं गाणाऱ्या अपंग व्यक्तींना प्रशिक्षण देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी जून २०१२ मध्ये 'स्वराधार' या संस्थेची निर्मिती हेमलता तिवारी यांनी केली. त्यांच्यासाठी काम करताना येणाऱ्या अडचणी व त्यातून काढलेले मार्ग हे सगळे अनुभव विद्यार्थिनी समोर मनमोकळेपणाने मांडला. निमित्त होते सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित 'शारदोत्सव २०२३' व्याख्यानमाला 'अंतर्गत 'नवदुर्गा: नवविचार' याचे औचित्य साधून आयोजित व्याख्यानमालेच्या सहाव्या दिवशी हेमलता तिवारी यांनी 'स्वराधार' या विषयावर विद्यार्थिनींसोबात संवाद साधला. या कार्यक्रमासाठी समाजशास्त्र विभागाच्या प्रा.किरण जाधव यांनी महाविद्यालयाच्यावतीने उपस्थितांचे स्वागत केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ.रश्मी शेट्ये तुपे यांनी केले.तर प्रमुख मार्गदर्शकांची ओळख प्रा.सुप्रिया शिंदे यांनी केले. या कार्यक्रमासाठी अनेक विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

**कविता लिहून**

कित्येक रात्री बेधुंद गेल्या
प्रश्न उत्तराचे
कॉकटेल झाल्यावर...

आताशा, शब्द येत नाही
सिझर होऊन ओठावर...

समस्येच्या शुक्राणू
गर्भाशयातच अंकुरले
अर्भकाच्या देठावर...

शब्दाच्या समागमातून
प्रसवली कविता
माणसाची माणसासाठी...

कविता जगलो
मांडली दु:खाची, वेदनेची
उतरंड कवितेतूनच...

पण,कविता लिहून
आसरा झाले नाही
शब्द कोणत्या पामराचे
पाय झाले नाही
कुण्या लंगड्याचे...

कविता लिहून
घालता आली नाही
जखमावर फुंकर
बळ नाही आणता आले
जगण्याचे...

मी कागदाचे अंग
कुठपर्यंत
काळे करायचे...

**डॉ.सुनील श्रीराम पवार**
**मेहकर, जिल्हा बुलढाणा**

**जेष्ठ गझलकार म. भा. चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली कोजागिरी निमित्त काव्य चंद्रोत्सव रंगणार**

वर्ल्ड व्हिजन संस्थेतर्फे रविवार दि. २९ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने काव्य चंद्रोत्सव आयोजित करण्यात आला आहे . या काव्यसंध्येचे अध्यक्षस्थान जेष्ठ गझलकार म.भा . चव्हाण भुषविणार आहेत . हि काव्यसंध्या रात्री ९ ते १० या वेळेत आयोजित करण्यात आली आहे . या काव्यसंध्येत महाराष्ट्रातील विविध नामवंत कवि - कवयित्री सहभागी होणार आहेत . असे संस्थेच्या कार्याध्यक्षा योगिता पाखले यांनी कळवले आहे .

**जाणिवा नेणिवा**

जाणीव आणी नेणिवांच्या या मर्त्य संसारात
अंती सुखदु:खसंवेदनांचाच होतो खरा निचरा
आणि चैतन्याचा आविष्कार होतो अचेतन
तडफडणारी केविलवाणी ती असह्य धडपड
जीवनातील एक दारुणतेच सत्यदर्शन असतं
भग्न मन सतत सावरायचा प्रयत्न करीत असतं
पण भोगणे आणि फक्त नि:शब्द भोग भोगणे
एवढेच काय ते व्याकुळलं होवून जात असतं
पराधिनतां हेच जीवनाचं निर्मळ वास्तव असतं
आत्मचिंतनाची दोरी किती किती ताण ताणावी
या व्यर्थ संसारात डुंबता डुंबता बुडणं हे वास्तव
जन्ममृत्यूच्या पालखित बसुन अनुभवायचं असतं
जाणीव नेणिवांच्या संवेदनांना मिठीत घ्यावं लागतं
यालाच जगणं म्हणून फक्त समजून घ्यायचं असतं
काळाचे कालचक्रच अखंडित अविश्रांत असतं
दोन्ही बाहू पसरुन त्याच स्वागत करायचं असतं
सुर्यप्रकाशा सारखं शाश्वत सत्य तेच एक असतं
जे अगाध नामस्मरणाच सात्विक संचित असतं......

**वि.ग.सातपुते(9766544908)**

**सवाल**

माझे सवाल तेव्हा सारे मवाळ होते
त्यांनाच हासणारे तेथे टवाळ होते

मी शोधतो नव्याने माझ्याच अंतराला
त्याच्या सभोवताली सारे बवाळ होते

कंठा असा विराजे कंठात शोभणारा
त्याच्यात गोवलेले मोती नवाळ होते

प्यावे कसे मुखाने दोहांमधील पाणी
गाळात खेळणारे पाणी ढवाळ होते

जाडेपणास संधी खातात रोज चंदी
ताटात तूप त्यांच्या तेथे रवाळ होते

**श्री. एकनाथ गायकवाड**
**जनता विद्यामंदिर, त्रिंबक**
**ता.मालवण जि. सिंधुदुर्ग**
**पिन. 416 614**
**मो.नं.94211823 37**

worldvisiontimesmumbai@gmail.com

**पुष्प सातवे**

**गोमाता आणि स्त्री**

**व्याख्याते : मधुरा गोसंवर्धन अध्यक्षा दिपाली जंगम**

गेल्या काही वर्षात भारतीय गोवंशाच्या गायींचे अस्तित्व कमी होत आहे.आपण अनेक शहरी व ग्रामीण भागात गायींचा उपयोग झाल्यावर त्या अशाच सोडून दिल्या जातात.अशा भाकड गायींचे संरक्षण व संवर्धन करणे, त्यांच्या पासून पंचगव्य औषधे निर्माण करण्याचे कार्य मधुरा गोसंवर्धन संस्था करते.आज या संस्थेकडे हिर, थारपारकर,कपिला अशा अनेक गायींचे संगोपन केले जात आहे. त्यांच्या गोशाळा माणगाव, कर्जत अशा अनेक ठिकाणी आहेत.हा प्रवास सोपा नव्हता.या क्षेत्रात निर्माण होणाऱ्या अडचणी व अनुभव मधुरा गोसंवर्धन अध्यक्षा दिपाली जंगम यांनी मांडला. निमित्त होते सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित 'शारदोत्सव २०२३' व्याख्यानमाला अंतर्गत 'नवदुर्गा: नवविचार' याचे औचित्य साधून आयोजित 'गोमाता आणि स्त्री' या व्याख्यानमालेच्या सातव्या दिवशी दिपाली जंगम यांनी या विषयावर विद्यार्थिनीं सोबत संवाद साधला.



देशी गायींचे संवर्धन करणे ही काळाची गरज - पंचगव्य चिकित्सक मधुरा गोसंवर्धन संस्था अध्यक्षा दिपाली जंगम



देशी गायींचे संवर्धन करणे ही काळाची गरज - पंचगव्य चिकित्सक मधुरा गोसंवर्धन संस्था अध्यक्षा दिपाली जंगम

**वसई दि.२३ (प्रतिनिधी):** गेल्या काही वर्षात भारतीय गोवंशाच्या गायींचे अस्तित्व कमी होत आहे.आपण अनेक शहरी व ग्रामीण भागात गायींचा उपयोग झाल्यावर त्या अशाच सोडून दिल्या जातात.अशा भाकड गायींचे संरक्षण व संवर्धन करणे, त्यांच्या पासून पंचगव्य औषधे निर्माण करण्याचे कार्य मधुरा गोसंवर्धन संस्था करते. आज या संस्थेकडे हिर, थारपारकर,कपिला अशा अनेक गायींचे संगोपन केले जात आहे. त्यांच्या गोशाळा माणगाव, कर्जत अशा अनेक ठिकाणी आहेत.हा प्रवास सोपा नव्हता.या क्षेत्रात निर्माण होणाऱ्या अडचणी व अनुभव मधुरा गोसंवर्धन अध्यक्षा दिपाली जंगम यांनी मांडला.निमित्त होते सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित फशारदोत्सव २०२३ व्याख्यानमाला फअंतर्गत फ्नवदुर्गा: नवविचारफ याचे औचित्य साधून आयोजित व्याख्यानमालेच्या सातव्या दिवशी दिपाली जंगम यांनी या विषयावर विद्यार्थिनीं सोबत संवाद साधला. या कार्यक्रमासाठी समाजशास्त्र विभागाच्या प्रा.किरण जाधव उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ.रश्मी शेट्ये तुपे यांनी केले.तर प्रमुख मार्गदर्शकांची ओळख प्रा.सुप्रिया शिंदे यांनी केले. या कार्यक्रमासाठी अनेक विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

**पुष्प आठवे**
**मराठी परंपरा आणि ख्रिस्ती स्त्री**
**व्याख्याते : सामवेदी लेखिका मेल्सीना तुस्कानो**

कॉर्पोरेट ते सामवेदी, कुपारी बोलीत लिहिण्याऱ्या कवियित्री, लेखिका मेल्सीना तुस्कानो ह्यांनी संपूर्ण वसई, विरार भागातील ख्रिस्ती धर्मिय आणि भारतीय सण, परंपरा, रूढी, संस्कृती ह्यांचा आढावा घेतला. 'मराठी परंपरा आणि ख्रिस्ती स्त्री हे काहीही वेगळं समीकरण नाही. परंपरा, रूढी,संस्कार आणि बोली भाषा जपणे हे आपले आद्य कर्तृत्त्वच आहे. वसई, विरार भागात रहाणारे आम्ही ख्रिश्चन धर्मिय लोक मराठी सणांमध्ये आनंदाने सहभागी असतो. मग गणपती असो की होळी, गोविंदा असो की दिवाळी आम्ही तितक्याच उत्सहाने सहभागी होतो. वसई, विरार भागातील ख्रिश्चन स्त्रीचा पोशाख देखील मराठमोळाच आहे. नऊवारी साडी, कपाळावर कुंकू हा तिचा पेहरावा आहे. ख्रिस्ती शाळा,महाविद्यालयात देखील भारतीय संस्कृती, रूढी, परंपरा जपण्याचा प्रयत्न केला जातो. खाद्यसंस्कृतीसुद्धा शंकरपाळी, पुरणपोळी, करंज्या आवडीने बनवल्या जातात. तर मराठी साहित्यक्षेत्रात ख्रिस्ती लेखक म्हणून फादर फ्रान्सिस दिब्रिटो, सिसिलिया कार्व्हालो ह्यांचा साहित्याचा आढावा घेतला. स्वरचित होळी, गोविंदा, दिवाळी अशा सणांवरच्या कविता सादर केल्या. मेल्सीनो तुस्कानो स्वतः सामवेदी, कुपारी बोलीत लिखाण करीत असल्याने सामवेदी कुपारी बोलीतील रविवार स्पेशल चिकनवरची कविता सादर केली.'

ह्या साऱ्याचा आढावा घेण्याचे निमित्त होते सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य महिला स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित 'शारदोत्सव २०२३' व्याख्यानमाला अंतर्गत 'नवदुर्गा: नवविचार' याचे औचित्य साधून आयोजित व्याख्यानमालेच्या आठव्या दिवशी श्रीमती मेल्सीना तुस्कानो यांनी 'मराठी परंपरा आणि ख्रिस्ती स्त्री' या विषयावर विद्यार्थिनींसोबात संवाद साधला.


## भारतीय परंपरा, रूढी,संस्कार आणि बोली भाषा जपणे हे आपले आद्य कर्तृत्त्वच आहे - सामवेदी लेखिका मेल्सीना तुस्कानो

**वसई, प्रतिनिधी**

कॉर्पोरेट ते सामवेदी, कुपारी बोलीत लिहिण्याऱ्या कवियित्री, लेखिका मेल्सीना तुस्कानो ह्यांनी संपूर्ण वसई, विरार भागातील ख्रिस्ती धर्मिय आणि भारतीय सण, परंपरा, रूढी, संस्कृती ह्यांचा आढवा घेतला. ङ्गमराठी परंपरा आणि ख्रिस्ती स्त्री हे काहीही वेगळं समीकरण नाही. परंपरा, रूढी,संस्कार आणि बोली भाषा जपणे हे आपले आद्य कर्तृत्त्वच आहे. वसई, विरार भागात रहाणारे आम्ही ख्रिश्चन धर्मिय लोक मराठी सणांमध्ये आनंदाने सहभागी असतो. मग गणपती असो की होळी, गोविंदा असो की दिवाळी आम्ही तितक्याच उत्सहाने सहभागी होतो. वसई, विरार भागातील ख्रिश्चन स्त्रीचा पोशाख देखील मराठमोळाच आहे. नऊवारी साडी, कपाळावर कुंकू हा तिचा पेहरावा आहे. ख्रिस्ती शाळा, महाविद्यालयात देखील भारतीय संस्कृती, रूढी, परंपरा जपण्याचा प्रयत्न केला जातो. खाद्यसंस्कृतीसुद्धा शंकरपाळी, पुरणपोळी, करंज्या आवडीने बनवल्या जातात. तर मराठी साहित्यक्षेत्रात ख्रिस्ती लेखक म्हणून फादर फ्रान्सिस दिब्रिटो, सिसिलिया कार्व्हालो ह्यांचा साहित्याचा आढावा घेतला. स्वरचित होळी, गोविंदा, दिवाळी अशा सणांवरच्या कविता सादर केल्या. मेल्सीनो तुस्कानो स्वतः सामवेदी, कुपारी बोलीत लिखाण करीत असल्याने सामवेदी कुपारी बोलीतील रविवार स्पेशल चिकनवरची कविता सादर केली. ह्या साऱ्याचा आढावा घेण्याचे निमित्त होते सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य महिला स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित शारदोत्सव २०२३' व्याख्यानमाला अंतर्गत नवदुर्गा: नवविचारफ याचे औचित्य साधून आयोजित व्याख्यानमालेच्या आठव्या दिवशी श्रीमती मेल्सीना तुस्कानो यांनी मराठी परंपरा आणि ख्रिस्ती स्त्रीफ या विषयावर विद्यार्थिनींसोबात संवाद साधला. या कार्यक्रमासाठी समाजशास्त्र विभागाच्या प्रा.किरण जाधव यांनी महाविद्यालयाच्यावतीने उपस्थितांचे स्वागत केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ.रश्मी शेट्ये तुपे यांनी केले. सदर कार्यक्रम आभासी पद्धतीने घेतला गेल्याने कार्यक्रमासाठी अनेक विद्यार्थिनी व पालक उपस्थित होते.

**पुष्प नववे**

**कवितेच्या वाटेवर चालताना**

**व्याख्याते : कवयित्री, लेखिका, संपादीका डॉ. पल्लवी परूळेकर-बनसोडे**

शब्द, कविता, लेखिका ते संपादीका असा स्वतःचा प्रवास घडवित असताना काही कडूगोड प्रसंगांना सामोरे जाताना शब्दांनीच ताकद दिली. शब्दांमध्ये अफाट ताकद असते, प्रचंड सकारात्मक ऊर्जा असते. त्यामुळेच संकटातही उभे रहाण्याचे बळ केवळ शब्दांनीच दिले. स्वतःला इतके सक्षम बनवा की, कोणत्याही कठीण प्रसंगी आत्मविश्वासाने उभे रहा. आपले महाविद्यालय खूप मोठे कार्य करीत आहे. स्त्रीशक्तीची जाणिव करून देणे, स्त्रीशक्तीचे संस्कार तुमच्यावर घडवित आहेत. असे विधान  सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य महिला स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित ‘शारदोत्सव २०२३’ (वर्ष तिसरे) व्याख्यानमाला अंतर्गत ‘नवदुर्गा: नवविचार’ याचे औचित्य साधून आयोजित व्याख्यानमालेच्या नवव्या दिवशी डॉ. पल्लवी परूळेकर-बनसोडे यांनी ‘कवितेच्या वाटेवर चालताना’ या विषयावर विद्यार्थिनींसोबत संवाद साधते वेळी केले.

‘वाचन प्रेरणा दिनापासून सुरू झालेली व्याख्यानमाला ‘कवितेच्या वाटेवर चालताना’ ह्या व्याख्यानाने संपली. स्त्रीशक्तीमध्ये प्रचंड ताकद असते ह्याचा प्रत्यय विद्यार्थिंनी सलग नऊ दिवस घेतला. आमच्या विद्यार्थिंनी खरोखर भाग्यवान आहेत. ही प्रेरणा घेऊन विद्यार्थिंनी स्वतःला सक्षम बनवतील अशी अविस्मरणीय व्याख्यानमाला गेली तीन वर्षे आमच्याकडे होत आहे. ह्याकरिता मराठी विभागाचे मनापासून अभिनंदन.’ असे उदगार महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अर्चना पत्की सांनी काढले.



‘शब्दांमुळे संकटावेळी उभे राहण्याचे बळ’

विरार, ता. २५ (बातमीदार) : शब्द, कविता, लेखिका ते संपादिका असा स्वतःचा प्रवास घडत असताना काही कडू-गोड प्रसंगांना सामोरे जाताना शब्दांनीच ताकद दिली. शब्दांमध्ये अफाट ताकद असते. प्रचंड सकारात्मक ऊर्जा असते. त्यामुळेच संकटातही उभे राहण्याचे बळ केवळ शब्दांनीच दिले. स्वतःला इतके सक्षम बनवा की, कोणत्याही कठीण प्रसंगी आत्मविश्वासाने उभे रहा. स्त्री शक्तीची जाणीव करून देणे, स्त्री शक्तीचे संस्कार तुमच्यावर घडवीत आहेत, असे कवयित्री डॉ. पल्लवी परुळेकर-बनसोडे म्हणाल्या.

डॉ. पल्लवी परुळेकर-बनसोडे

श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य महिला स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित 'शारदोत्सव' व्याख्यानमाला अंतर्गत 'नवदुर्गा: नवविचार' याचे औचित्य साधून 'कवितेच्या वाटेवर चालताना' या विषयावर विद्यार्थिनींसोबत संवादावेळी त्या बोलत होत्या. वाचन प्रेरणा दिनापासून सुरू झालेली व्याख्यानमाला 'कवितेच्या वाटेवर चालताना' या व्याख्यानाने संपली. स्त्री शक्तीमध्ये प्रचंड ताकद असते, याचा प्रत्यय विद्यार्थिनींनी सलग नऊ दिवस घेतला. ही प्रेरणा घेऊन विद्यार्थिनी स्वतःला सक्षम बनतील, अशी अविस्मरणीय व्याख्यानमाला होत आहे, असे उद्गार प्राचार्या डॉ. अर्चना पत्की सांनी काढले.

**सलग तिसऱ्या वर्षी श्रीमती मणिबेन एम पी शाह महिला महाविद्यालयात**

**नवदुर्गाचा वैचारिक जागर - प्राचार्य डॉ. अर्चना पत्की**

सलग तिसऱ्या वर्षी 'वाचन संस्कृतीपासून ते शब्दांच्या ताकदीवर स्वतःला घडविणाऱ्या, स्वतःमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याऱ्या नवदुर्गाच्या नवविचारांचा वैचारिक जागर थक्क करणारा आहे.' असे विधान सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती. माणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. अर्चना पत्की यांनी मराठी विभाग आयोजित 'शारदोत्सव २०२३'व्याख्यानमाला (वर्ष तिसरे) 'नवदुर्गा : नवविचार' या व्याख्यानमालेच्या शेवटच्या पुष्पाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या 'कवितेच्या वाटेवर चालताना' ह्या व्याख्याना प्रसंगी केले.

पहिले पुष्प हे वाचन प्रेरणा दिनानिमित्त दिसामाजी काही तरी वाचत रहावे. वाचन ही एकमेव गोष्ट आहे जी तुमचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात असते. वाचनाने ज्ञान वृद्धिंगत होते, आपल्याकडे ज्ञानाचा खजिना असेल तर आपण आयुष्यातील प्रत्येक समस्येवर यशस्वीपणे मात करू शकतो असे प्रतिपादन शिक्षिका, साहित्यिका, कवयित्री व भारत गौरव पुरस्कार प्राप्त सौ.राजश्री बोहरा यांनी केले. दुसऱ्या पुष्पात 'महाराष्ट्राचा उंबरठा ओलांडताना' विवाहानंतर महाराष्ट्रातून कर्नाटकात आल्यावर वृषाली पाटील यांनी शब्दांना ओंजळीत घेऊन कन्नड भाषेला जवळ करीत 'उंबरा ओलांडताना', 'ऐक कृष्णामाई', 'मोकळा श्वास' अशा अनेक कविता त्या रचित गेल्या स्वतःला घडवित गेल्या. तिसऱ्या पुष्पात कवयित्री,लेखिका, 'साहित्य कस्तुरी' संचालिका सौ.विद्याराणी मलवडकर यांनी विद्यार्थिंनीना मानवी जीवन जगताना सकारात्मकता उरी बाळगून निराश झटकून आयुष्य सुंदर आणि यशस्वी कसे करावे हा 'मायेचा कानमंत्र'दिला. चौथ्या पुष्पात व्यवसायिक प्रियंका कुटे यांनी उद्योगजग आणि स्त्री ह्या व्याख्यानात स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी सर्वांत प्रथम स्वतःमध्ये आत्मविश्वास निर्माण करा. कडूगोड अनुभवातूनही स्वतःचे खच्चीकरण न करता खंबीरपणे उभे रहा असा मोलाचा संदेश विद्यार्थिंनीना दिला.

पुष्प पाचवे यात सध्याचे युग हे प्रसारमाध्यमांचे युग आहे. लोकशाही अधिक समृद्ध होण्यासाठी तसेच माहितीचा मुक्त प्रवाह समाजात पसरविण्यासाठी प्रसारमाध्यमांची आवश्यकता असते.स्त्रिया हे माध्यम शिक्षण गांभीर्याने घेत नाहीत; स्त्रियांचे हे क्षेत्र नव्हे तर या जुनाट भूमिकेतून बाहेर पडलं पाहिजे. ज्ञान आणि कौशल्य यांच्या बळावर प्रसार माध्यमातील स्त्रियांचा सहभाग निश्चित वाढू शकतो.असे विचार 'प्रसार माध्यमातील ती' या विष्यावर झी २४ तास डॉट कॉमच्या चीफ सबएडिटर दक्षता ठासळे यांनी केले. पुष्प सहावे हे रेल्वे स्टेशनवर गाणे गाणाऱ्या अपंग व्यक्तींना प्रशिक्षण देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी जून २०१२ मध्ये 'स्वराधार' या संस्थेची निर्मिती करणाऱ्या श्रीमती हेमलता तिवारी यांचे महत्त्वाचे व्याख्यान ठरले. अंध कलाकारांसाठी काम करताना येणाऱ्या अडचणी व त्यातून काढलेले मार्ग हे सगळे अनुभव त्यांनी विद्यार्थिंनी समोर मनमोकळेपणाने मांडले. सातवे पुष्प हे 'गोमाता आणि स्त्री' ह्या विष्यावर आधारीत होते. गेल्या काही वर्षात भारतीय गोवंशाच्या गायींचे अस्तित्व कमी होत आहे. आपण अनेक शहरी व ग्रामीण भागात गायींचा उपयोग झाल्यावर त्या अशाच सोडून दिल्या जातात. अशा भाकड गायींचे संरक्षण व संवर्धन करणे, त्यांच्यापासून पंचगव्य औषधे निर्माण करण्याचे कार्य मधुरा गोसंवर्धन संस्थेच्या अध्यक्षा दिपाली जंगम अगदी प्रामाणिकपणे करतात त्यांचे हे कार्य खूप प्रेरणादायी ठरले.

पुष्प आठवे हे 'मराठी परंपरा आणि ख्रिस्ती स्त्री' ह्या विषयावर आधारीत होते त्यात भारतीय परंपरा, रूढी,संस्कार आणि बोली भाषा जपणे हे आपले आद्य कर्तृत्त्वच आहे असा मोलाचा संदेश सामवेदी लेखिका मेल्सीना तुस्कानो यांनी दिला. वाचन प्रेरणा दिनापासून सुरू झालेली व्याख्यानमाला 'कवितेच्या वाटेवर चालताना' ह्या व्याख्यानाने संपली. शब्द, कविता, लेखन ते संपादीका असा प्रवास स्वतःचा घडवित विद्यार्थिंनी इतके सक्षम बना की कोणतेही संकट आले तरी त्यावर हसत,

सकारात्मकतेने मात करा. ह्या नवरात्री निमित्त आपले महाविद्यालय विद्यार्थिनींवर स्त्रीशक्तीचे संस्कार घडविण्याचे अप्रतिम काम करीत आहे अशा मौल्यवान विचारांनी व्याख्यानमालेची सांगता झाली.



शनिवार दि. २८ ऑक्टोबर २०२३ ८

# सलग तिसऱ्या वर्षी श्रीमती मणिबेन एम पी शाह महिला महाविद्यालयात नवदुर्गांचा वैचारिक जागर –प्राचार्य डॉ. अर्चना पत्की

**वसई दि. २७ (प्रतिनिधी) :** स्त्री शक्तीमध्ये प्रचंड ताकद असते ह्याचा प्रत्यय विद्यार्थिनी सलग नऊ दिवस घेतला. आमच्या विद्यार्थिनी खरोखर भाग्यवान आहेत. स्त्रीशक्तीची प्रेरणा घेऊन विद्यार्थिनी स्वतःला सक्षम बनवतील अशी अविस्मरणीय व्याख्यानमाला गेली तीन वर्षे आमच्याकडे होत आहे. सलग तिसऱ्या वर्षी सेवा मंडळ एज्येशन सोसयटी संचालित श्रीमती. मणिबेन एम पी शाह कला आणि वाणिज्य महिला स्वायत्त महाविद्यालयात नवदुर्गांचा वैचारिक जागर सुरू आहे. असे उद्गार महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अर्चना पत्की यांनी मराठी विभाग आयोजित 'शारदोत्सव २०२३ व्याख्यानमाला (वर्ष तिसरे) 'नवदुर्गा : नवविचार या व्याख्यानमालेच्या शेवटच्या पुष्पाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या 'कवितेच्या वाटेवर चालताना ह्या व्याख्याना प्रसंगी काढले. पहिले पुष्प हे 'स्त्री वाचते तेव्हा ह्या व्याख्याने सुरुवात झाली. वाचन प्रेरणा दिनानिमित्त दिसामाजी काही तरी वाचत रहावे. वाचन ही एकमेव गोष्ट आहे जी तुमचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात असते. वाचनाने ज्ञान वृद्धिंगत होते, आपल्याकडे ज्ञानाचा खजिना असेल तर आपण आयुष्यातील प्रत्येक समस्येवर यशस्वीपणे मात करू शकतो असे प्रतिपादन शिक्षिका, साहित्यिका, कवयित्री व भारत गौरव पुरस्कार प्राप्त सौ.राजश्री बोहरा यांनी केले. दुसऱ्या पुष्पात 'महाराष्ट्राचा उंबरठा ओलांडताना' विवाहानंतर महाराष्ट्रातून कर्नाटकात आल्यावर कवयित्री वृषाली पाटील यांनी शब्दांना ओंजळीत घेऊन कन्नड भाषेला जवळ करीत 'उंबरा ओलांडताना', 'ऐक कृष्णामाई', 'मोकळा श्वास अशा अनेक कविता त्या रचित गेल्या स्वतःला घडवित गेल्या. तिसऱ्या पुष्पात कवयित्री,लेखिका, 'साहित्य कस्तुरी' संचालिका सौ.विद्याराणी मलवडकर यांनी विद्यार्थिनींना मानवी जीवन जगताना सकारात्मकता उरी बाळगून निराश झटकून आयुष्य सुंदर आणि यशस्वी कसे करावे हा 'मायेचा कानमंत्र दिला. चौथ्या पुष्पात व्यवसायिक प्रियंका कुटे यांनी 'उद्योगजग आणि स्त्री' ह्या व्याख्यानात स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी सर्वात प्रथम स्वतःमध्ये आत्मविश्वास निर्माण करा. कडूगोड अनुभवातूनही स्वतःचे खच्चीकरण न करता खंबीरपणे उभे रहा असा मोलाचा संदेश विद्यार्थिनींना दिला.

पुष्प पाचवे यात सध्याचे युग हे प्रसारमाध्यमांचे युग आहे. लोकशाही अधिक समृद्ध होण्यासाठी तसेच माहितीचा मुक्त प्रवाह समाजात पसरविण्यासाठी प्रसारमाध्यमांची आवश्यकता असते. स्त्रिया हे माध्यम शिक्षण गांभीर्याने घेत नाहीत; स्त्रियांचे हे क्षेत्र नव्हे तर या जुनाट भूमिकेतून बाहेर पडलं पाहिजे. ज्ञान आणि कौशल्य यांच्या बळावर प्रसार माध्यमातील स्त्रियांचा सहभाग निश्चित वाढू शकतो.असे विचार 'प्रसार माध्यमातील ती' या विषयावर झी २४ तास डॉट कॉमच्या चीफ सबएडिटर दक्षता ठासळे यांनी केले. पुष्प सहावे हे रेल्वे स्टेशनवर गाणे गाणाऱ्या अपंग व्यक्तींना प्रशिक्षण देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी जून २०१२ मध्ये 'स्वराधार' या संस्थेची निर्मिती करणाऱ्या श्रीमती हेमलता तिवारी यांचे महत्त्वाचे व्याख्यान ठरले. अंध कलाकारांसाठी काम करताना येणाऱ्या अडचणी व त्यातून काढलेले मार्ग हे सगळे अनुभव त्यांनी विद्यार्थिनी समोर मनमोकळेपणाने मांडले. सातवे पुष्प हे 'गोमाता आणि स्त्री' ह्या विषयावर आधारित होते. गेल्या काही वर्षात भारतीय गोवंशाच्या गायींचे अस्तित्व कमी होत आहे. आपण अनेक शहरी व ग्रामीण भागात गायींचा उपयोग झाल्यावर त्या अशाच सोडून दिल्या जातात. अशा भाकड गायींचे संरक्षण व संवर्धन करणे, त्यांच्यापासून पंचगव्य औषधे निर्माण करण्याचे कार्य मधुरा गोसंवर्धन संस्थेच्या अध्यक्षा दिपाली जंगम अगदी प्रामाणिकपणे करतात, त्यांचे हे कार्य खूप प्रेरणादायी ठरले.

पुष्प आठवे हे 'मराठी परंपरा आणि ख्रिस्ती स्त्री' ह्या विषयावर आधारित होते त्यात भारतीय परंपरा, रूढी,संस्कार आणि बोली भाषा जपणे हे आपले आद्य कर्तुत्वच आहे असा मोलाचा संदेश सामवेदी लेखिका मेल्सीना तुस्कानो यांनी दिला. वाचन प्रेरणा दिनापासून सुरू झालेली व्याख्यानमाला 'कवितेच्या वाटेवर चालताना' ह्या व्याख्यानाने संपली. शब्द, कविता, लेखन ते संपादीका असा प्रवास स्वतःचा घडवित विद्यार्थिनी इतके सक्षम बना की कोणतेही संकट आले तरी त्यावर हसत, सकारात्मकतेने मात करा. ह्या नवरात्री निमित्त आपले महाविद्यालय विद्यार्थिनींवर स्त्रीशक्तीचे संस्कार घडविण्याचे अप्रतिम काम करीत आहे अशा मौल्यवान विचारांनी व्याख्यानमालेची सांगता झाली. सदर व्याख्यानमाला यशस्वीरित्या पार पडली. शेवटच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रश्मी शेटये- तुपे यांनी केले. तर नऊ दिवसांचा आढावा व आभार प्रदर्शन कु. मनाली मणचेकर हिने केले. कार्यक्रमात महाविद्यालयातील मान्यवर प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, आणि मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.



नवदुर्गा : नवविचार या व्याख्यानमालेचा आढावा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अर्चना पत्की यांनी घेतला.